गडनदी मध्यम प्रकल्प, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०१७/६४५/(प्र.क्र. १९५/१७)/ मध्यम प्रकल्प
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८ मार्च,२०१९.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. जीएडी/ १०८१/२८३/१५-१६ जसंअ.३ दिनांक२०/०८/१९८३.
२) शासन निर्णय गडनदी / १०९६/ २६३९/(६४३/९६) म. प्र. दिनांक२५/०२/२०००
३) शासन निर्णय क्र. गडनदी / २००८/१०७४/(२६३/२००८) म.प्र. दिनांक ०५/०९/२००९
४) शासन निर्णय क्र. गडनदी / २०१०/९२६/(३११/२०१०) म.प्र. दिनांक २७/०९/२०११
५) कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे पत्र कोंपाविम/तां.१/गडनदी/ चतुर्थसुप्रमा /१७७१ दिनांक १६/०६/२०१७.

प्रस्तावना:-

गडनदी मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मौजे कुचांबे ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे गडनदीवर ८३.२१२ दलघमी क्षमतेचे माती धरण बांधणे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प कोकण पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत "उर्वरीत महाराष्ट्र" या प्रदेशांतर्गत आहे. या प्रकल्पाचा समावेश **"प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY)"** या योजनेंतर्गत करण्यात आलेला आहे. धरणाच्या बुडीत क्षेत्रालगतच्या संगमेश्वर तालुक्यातील ३९३ हे. क्षेत्रासाठी उपसासिंचन योजना नियोजीत आहे. तसेच प्रकल्पांतर्गत ४७.०० कि.मी. लांबीच्या उजव्या कालव्याव्दारे चिपळूण तालुक्यातील १० गावातील १३६६ हे. व संगमेश्वर तालुक्यातील ५ गावामधील ५२० हे. अशा प्रकारे १८८६ हे. क्षेत्रास सिंचन लाभ देण्याचे नियोजित आहे व २७.०० कि.मी. लांबीच्या डाव्या कालव्याव्दारे संगमेश्वर तालुक्यातील ६ गावातील ८३२ हे. क्षेत्रास सिंचनलाभ देणेचे नियोजित आहे. याप्रमाणे प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र ३१११ हे. इतके आहे.

गडनदी मध्यम प्रकल्प, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी या प्रकल्पास संदर्भ क्रमांक १ नुसार सन १९८२-८३ चे दरसूचीवर आधारित रूपये १०.३७ कोटी इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर संदर्भ क्रमांक २ नुसार सन १९९८-९९ चे दरसूचीवर आधारीत रूपये ११२.८० कोटी इतक्या रकमेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. संदर्भ क्रमांक ३ नुसार सन २००७-०८ चे दरसूचीवर आधारीत रूपये ४१९.८१ कोटी इतक्या रकमेस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती व संदर्भ क्रमांक ४ नुसार सन २००९-१० चे दरसूचीवर आधारीत रूपये ६५१.४२ कोटी इतक्या रकमेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती

कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे संदर्भ क्रमांक५ अन्वये सन २०१३-१४ चे दरसूचीवर आधारीत रुपये ९५०.३७ कोटी किंमतीचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर केला आहे. सदर चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्तावास व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यतेकरिता सादर करण्यासाठी नियोजन व वित्त विभागाची सहमती प्राप्त करून घेण्याकरिता प्रस्ताव सादर केला असता सदर चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यास संबंधीत विभागांनी कळविले आहे. प्रकल्पाचे लाभ व्यय गुणोत्तर २.०४ येत असून प्रकल्प आर्थिक मापदंडात बसतो.

सदर प्रकल्पाची प्रस्तावित चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रूपये ९५०.३७ कोटी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रूपये ६५१.४२ कोटी च्या तुलनेत रूपये २९८.९५ कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

अनुक्रमांक	बाब	वाढ (रुपये कोटी)
१	दरसूचीतील फरकामुळे झालेली वाढ	७३.३३
२	भूसंपादनातील वाढ	२१.९५
३	जादा दराची निविदा स्वीकृत केल्यामुळे झालेली वाढ	०.२७
४	संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ	३१.३०
५	इतर कारणे	
	अ) नवीन / वगळलेल्या तरतूदी	११.७८
	ब) अपु-या तरतूदी	९०.२४
	क) इतर वाढ	७३.६५
५	अनुषंगिक खर्चातील वाढ (इटीपी व इतर)	(-) ३.५७
	एकूण	**२९८.९५**

प्रकल्पाचा संकल्पित उपयुक्त पाणीसाठा ८३.२१२ दलघमी असून एकूण पाणीवापर ८५.९५७ दलघमी इतका आहे. धरणाच्या बुडीत क्षेत्रालगतच्या संगमेश्वर तालुक्यातील ३९३ हे. क्षेत्रासाठी उपसासिंचन योजना नियोजीत आहे. तसेच प्रकल्पांतर्गत ४७.०० कि.मी. लांबीच्या उजव्या कालव्याव्दारे चिपळूण तालुक्यातील १० गावातील १३६६ हे. व संगमेश्वर तालुक्यातील ५ गावामधील ५२० हे. अशा प्रकारे १८८६ हे. क्षेत्रास सिंचन लाभ देण्याचे नियोजित आहे व २७.०० कि.मी. लांबीच्या डाव्या कालव्याव्दारे संगमेश्वर तालुक्यातील ६ गावातील

८३२ हे. क्षेत्रास सिंचनलाभ देणेचे नियोजित आहे. याप्रमाणे प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र ३१११ हे. इतके आहे. सदर प्रकल्प केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेअंतर्गत (PMKSY) समाविष्ट आहे.

सदर प्रस्ताव मा. मंत्रीमंडळच्या दिनांक २०/०२/२०१९ रोजीच्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात आला. मा. मंत्रीमंडळाने बांधकामाची सद्य:स्थिती, किंमतवाढीची कारणमीमांसा इ. बाबींचा परामर्श घेऊन गडनदी मध्यम प्रकल्पाच्या सन २०१३-१४ दरसूची वर आधारित रुपये ९५०.३७ कोटी किंमतीच्या चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

शासनाच्या या निर्णयाव्दारे गडनदी मध्यम प्रकल्पाच्या सन २०१३-१४ दरसूची वर आधारित रुपये ९५०.३७ कोटी (रुपये नऊशे पन्नास पूर्णांक सदतीस शतांश कोटी फक्त) किंमतीच्या चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रूपये ९०९.५० कोटी (रुपये नऊशे नऊ पूर्णांक पाच दशांश कोटी फक्त) कामाप्रीत्यर्थ व रुपये ४०.८७ कोटी (रुपये चाळीस पूर्णांक सत्याऐंशी शतांश कोटी फक्त) अनुषंगिक खर्चासाठी तरतूद आहे. उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा सोबत जोडण्यात येत आहे.

२. या योजनेस प्रदान केलेली चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता मध्यम प्रकल्प कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ०५/२०१९ वर नोंदवण्यात आली आहे.

३. सदर प्रकल्पाचे उर्वरित काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यता तरतुदीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

४. या प्रकल्पाच्या कामावर होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधा-यावरील भांडवली खर्च ०३, मध्यम पाटबंधारे प्रकल्प (वाणिज्यिक) गडनदी मध्यम पाटबंधारे प्रकल्प (योजनांतर्गत) या लेखाशिर्षाखाली खर्च टाकावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५.१) सदर प्रकल्पावर झालेल्या जास्तीच्या खर्चास शासन मान्यता घेण्यात यावी.
५.२) प्रकल्प चतुर्थ सुप्रमा किंमतीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावा.
५.३) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात जलसंपदा विभागाने

प्रचलित शासन निर्णय, केंद्रीय जल आयोगाची (CWC) मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपद्धती याची काटेकोरपणे अंबलबजावणी करण्यात यावी.

५.४) सदर प्रकल्पासंदर्भात आधीच्या कालावधीमध्ये जर काही आर्थिक व कार्यपद्धतीत अनियमितता झाल्या असतील , कोणतीही नियमबाह्य कार्यवाही करण्यात आली असेल अथवा ज्यामुळे आर्थिक घोटाळा निर्माण होण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही बाबींना या सुप्रमा प्रस्तावामध्ये सहमती दिली आहे असे म्हणता येणार नाही व अशी कोणतीही सहमती / मान्यता प्रस्तुत प्रकल्पाबाबत दिलेली नाही. अशा प्रत्येक प्रकरणी व अशा प्रत्येक बाबीवर विहित कार्यपद्धतीस अनुसरून नस्ती सादर करून सक्षम प्राधिका-याची मान्यता घेण्यात यावी.

५.५) सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी अथवा निविदा विषयक क्षेत्रीय स्तरावरील निर्णयास किंवा झालेल्या क्षेत्रीय अनियमिततेस मान्यता गृहीत धरली जाणार नाही. तसेच सुधारित प्रशासकीय मान्यता देणारे प्राधिकारी हे झालेल्या क्षेत्रीय निर्णयास किंवाअनियमिततेस जबाबदार नसतील. याबाबतची जबाबदारी निर्णय घेणा-या क्षेत्रीय अधिका-यांची राहील. अशा तांत्रिक व निविदा विषयक प्रकरणांची तपासणी त्यावेळी असलेल्या प्रचलित शासन नियमांनुसार करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभाग, अनौपचारीक संदर्भ क्रमांक ८३/का.१४३४ दिनांक१४/०५/२०१८, वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ दिनांक०३/११/२०१८ व दिनांक २०/०२/२०१९ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३०८१४५८२८९४२७.असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: CN = Dharane Mallikarjun Irappa, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2019.03.08 15:01:28 +05'30'

(म.ई.धरणे)
शासनाचे उप सचिव

सहपत्र :- उपशीर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा

प्रत, सहपत्रांसह :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई

६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
१२) कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
१३) मुख्य अभियंता (द.व प्र) व सहसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई.
१५) उपसचिव (मो.प्र-१/ मो.प्र-२/जसं/निवसं/सिंव्य/लाक्षेवि/लपा/जवि),यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) अधीक्षक अभियंता, दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस.
१८) कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प व्हिभाग, अंबडपाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
१९) वित्त विभाग (व्यय-१२/ अर्थ-०२/अर्थ-१०/व्यय-६ अ), मंत्रालय, मुंबई.
२०) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई.
२१) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा
गडनदी मध्यम प्रकल्प, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०१७/६४५/(प्र.क्र. १९५/१७)/ मध्यम प्रकल्प दिनांक ०८/०३/२०१९ चे सहपत्र.

(किंमत रुपये लक्ष)

उपशीर्ष	मंजूर तृतीय सुप्रमानुसार तरतुद	चतुर्थ सुप्रमानुसार तरतुद	वाढ / घट (+/ -)	डिसेंबर २०१६ अखेर झालेला खर्च	उर्वरित किंमत
अ-शीर्षकामे					
अे - प्राथमिक	७८.८७	३८.०७	-४०.८०	३८.०७	०.००
बी - भूसंपादन	४०५७.७१	८३७८.९१	४३२१.२०	५८४१.८३	२५३७.०८
सी - कामे	४३७३१.३९	६१०६३.७१	१७३३२.३२	६०३५०.४७	७१३.२४
डी - विमोचक	२३२८.६५	३६०७.४६	१२७८.८१	३६०७.४६	०.००
जी-पूल	३४३.८८	३१६.७७	-२७.११	३१६.७७	०.००
के - इमारती	१२३.८७	४५.३९	-७८.४८	४५.३९	०.००
एम - प्लान्टेशन	४.१३	४.१३	०.००	०.००४	४.१३
ओ - संकीर्ण	१३४.६५	१३३.०२	-१.६३	१३३.०२	०.००
पी - देखभाल	४६७.९०	५५.१०	-४१२.८०	४७.९७	७.१३
क्यु-औजारे व संयंत्रे	५९.११	०.००	-५९.११	०.००	०.००
आर - रस्ते	६०२.६०	३८.३८	-५६४.२२	३८.३८	०.००
एक्स- पर्यावरण	७३.१७	७३.१७	०.००	०.००	७३.१७
एकूण (अ)	**५२००५.९३**	**७३७५४.११**	**२१७४८.१८**	**७०४१९.३६**	**३३३४.७५**
ब § कालवे व वितरण व्यवस्था					
अे - प्राथमिक	१०९.६५	११४.५३	४.८८	५५.७६	५८.७७
बी - भूसंपादन	३०१.५५	२३४३.१४	२०४१.५९	२९४.७०	२०४८.४४
सी - कामे	१५७.३५	१८८.०२	३०.६७	०.००	१८८.०२
डी - विमोचक	६५७.३२	७३०.५८	७३.२६	१४८.४६	५८२.१२
इ-प्रपात	३३.२७	२१.५३	-११.७४	२०.५३	१.००
एफ- मो-यांची कामे	३३०१.२५	५९०५.५८	२६०४.३३	१०५४.९६	४८५०.६२
जी-पूल	७४१.६४	२२५३.४७	१५११.८३	७२.०५	२१८१.४२
एच-निकासी	५०.१६	८०.१३	२९.९७	७.३९	७२.७४
के - इमारती	८३.९८	४२.३२	-४१.६६	४२.३२	०.००
एल- मातीकामे	२५९२.३५	३०९८.८९	५०६.५४	१३८०.६२	१७१८.२७
एम - प्लान्टेशन	११.२०	११.२०	०.००	०.०३	११.१७
ओ - संकीर्ण	१३५.७९	७८.४९	-५७.३०	७८.४९	०.००
पी - देखभाल	८१.६६	१२४.६५	४२.९९	२७.५८	९७.०७
क्यु-औजारे व संयंत्रे	३४.०६	०.००	-३४.०६	०.००	०.००
आर - रस्ते	३०.००	१७.८८	-१२.१२	१७.८८	०.००

उपशीर्ष	मंजूर तृतीय सुप्रमानुसार तरतुद	चतुर्थ सुप्रमानुसार तरतुद	वाढ / घट (+/ -)	डिसेंबर २०१६ अखेर झालेला खर्च	उर्वरित किंमत
यू-वितरण व्यवस्था	२५९.८०	१२६.७६	-१३३.०४	०.००	१२६.७६
व्ही-शेतचारी कामे	९९.०५	१८६३.४६	१७६४.४१	०.००	१८६३.४६
डब्ल्यू-निचराचारी कामे	१२.९६	१९५.३०	१८२.३४	०.००	१९५.३०
एकूण (ब)	**८६९३.०४**	**१७१९५.९३**	**९४३३.२१**	**३२००.७७**	**१३९९५.१६**
एकूण कामे (अ+ब)	**६०६९८.९७**	**९०९५०.०४**	**३०२५१.०७**	**७३६२०.१३**	**१७३२९.९१**
आस्थापना व इतर खर्च **(क)**	४४४३.५३	४०८६.९९	-३५६.५४	२२७५.११	१८११.८८
प्रकल्पाची एकूण किंमत (अ+ब+क)	**६५१४२.५०**	**९५०३७.०३**	**२९८९४.५३**	**७५८९५.२४**	**१९१४१.७९**

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: CN = Dharane Mallikarjun Irappa, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2019.03.08 15:01:46 +05'30'

(म.ई.धरणे)

शासनाचे उप सचिव